मुद्दा क्र. ३

कलम ४ (१) (ख) (iii)

निर्णय प्रक्रियेतील पर्यवेक्षण व जबाबदारीचे उत्तरयित्व निश्चित करुन कार्यपध्दतीबाबत तपशिल खालीलप्रमाणे -

तालेरा रुग्णालयतील प्रशासकीय कामकाजाच्या नस्ती मुख्य लिपीकामार्फत तपासूण मा. अति.आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांच्याकडे सादर केले जातात.

तालेरा रुग्णालय व त्यांच्या अंतर्गत 6 दवाखाने मार्फत कार्यक्षेत्रात येणा-या नागरिकांना वैद्यकीय सेवा पुरविणे, राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांची अंमलबजावणीसाठी रुग्णालय व दवाखान्यामधील ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी / प्रभारी वैद्यकीय अधिकारी यांच्या अंतर्गत असणा-या कर्मचा-यांकडून कामकाज केले जाते.

रुग्णालयात तातडीक व प्रसुती विभागात केसपेपर काढून तातडीक विभाग येथे वैद्यकीय अधिकारी यांचेकडून रुग्णास तपासले जाते व गरजेनुसार उपचार / दाखल / संदर्भिय केले जातात.

रुग्णालयाच्या ओ.पी.डी विभागा मध्ये आलेले रुग्ण ओ.पी.डी वेळेनुसार केसपेपर काढून गरजेनुसार संबंधीत विभागाचे वैद्यकीय अधिकारी यांच्याकडून तपासणी करुन तालेरा / क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले रुग्णालयाच्या आय.पी.डी विभागामध्ये 24 तास रुग्णांचे गरजेनुसार उपचार दिले जातात.

रुग्णालय व दवाखाने स्तरावरील कोणतीही अडचण आल्यास प्रशासकीय कामकाजाच्या नस्ती मुख्य कार्यालयाकडे सादर केली जाते.

धन्वंतरी स्वास्थ्य योजना 2013 - धन्वंतरी स्वास्थ्य योजना विभागामार्फत पिंपरी चिंचवड मनपा आस्थपनेवरील कायम स्वरुपी कार्यरत असणा-या कर्मचा-यांना व त्यांच्या कुटुंबीयांना (पती, पत्नी, 2 आपत्य 21वर्षा पर्यंत) वैद्यकीय सेवा पुरविल्या जातात. तसेच सेवानिवृत्त कर्मचा-यांनाही या सुविधेचा लाभ दिला जातो.